No. of Printed Pages : 7 **FMT-01**

# BACHELOR'S DEGREE PROGRAMME (BDP)

## Term-End Examination

## June, 2021

### FMT-01 : FOUNDATION COURSE IN MARATHI

*Time : 2 Hours* *Maximum Marks : 50*

***नोट :*** सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.

1. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : 10

(अ) जनसेवा हीच ईश्वरसेवा

(ब) वाचनाचे फायदे

(क) निसर्गाचे रक्षण

(ड) माणुसकी हाच खरा धर्म





2. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : 8

(अ) संत तुकारामांना एकांतवास का आवडे ?

(ब) 'आम्ही कोण' या कवितेतून केशवसुत हे कवीं बद्दलचा आत्मविश्वास कसा व्यक्त करतात ?

(क) मर्ढेकरांच्या कविशैलीची वैशिष्टये कोणती ?

(ड) 'कातरवेळ' या कथेत आक्काचे घरी आल्यावर कसे स्वागत झाले ?

3. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

(अ) 'वळीव' कथेत तात्याच्या मनात भय का निर्माण झाले ?

(ब) चेलम्याच्या प्रसंगातून लेखकाने समाजातील कोणत्या अपप्रवृत्तीवर प्रकाश टाकला आहे ?

(क) आकाश आणि कृष्ण यांच्यात शिरवाडकरानां कोणते साम्य आढलते ?

(ड) 'सांबर' एकांकितील कुंजा सांबराला का मरीत नाही ?

4. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर टीपा लिहा : 6

(अ) 'गुंड्याभाऊचे दुखणे' या कथेतील प्रसंगनिष्ठ विनोद

(ब) 'ऐतिहासिक सत्य' आणि 'साहित्यातील सत्य' यांतील फरक

(क) बालगंधर्वांच्या यशाचे रहस्य.

(ड) भाऊराव पाटील यांची स्वावलंबी शिक्षणाची योजना





5. तत्पुरुष समास म्हणजे काय ते सांगून त्याची दोन उदाहरणे विग्रह करून दाखवा. 5

**किंवा**

खालीलपैकी ***एका*** कल्पनेचा सुमारे सहा ते आठ ओळींत विस्तार करा :

(अ) मरावे परी कीर्तीरूपे करावे.

(ब) सत्यमेव जयते.

(क) निंकाचे घर असावे शेजारी.

6. खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : 3

(अ) तोंडचे पाणी पळणे

(ब) पावले जड होणे

(क) डोळयात धूल फेकणे

(ड) झळ बसणे

(इ) भेलकांडू लागणे

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही **तीन** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(अ) गरज सरो नि वैद्य मरो

(ब) आई जेऊ घालीना, बाप भीक मागू देईना.

(क) खाई त्याला खवखवे

(ड) नकटे व्हावे पण धाकटे होऊ नये

(इ) बोलेल ते करेल काय नि गर्जेल ते पडेल काय ?

7. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : 4

(अ) पर्यावरणातील बदलामुळे सजीवांची हानी कशी होते ?

(ब) स्त्रीला माणूस म्हणून प्रतिष्ठेचे स्थान का मिळाले पाहिजे ?

(क) विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे अनिष्ट परिणाम रोखण्यासाठी काय उपाय केले पाहिजेत ?

(ड) लोकशहीचे रक्षण कसे करता येते ?





8. खाली उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 4

Dr. Babasaheb Amedkar argued that the new Indian society must be based on social democracy. According to him it is a way of life which recognizes liberty, equality and fraternity. Although he perceived liberty as necessary for individual initiative, Ambedkar was more concerned with equality and fraternity. 'Equality had been largely absent in Indian society and it should be established at the earliest possible moment' said he. Later in his speeches, he repeatedly reaffirmed the need for social and economic equality.

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : 4

समाजाची एकसंधता टिकवून ठेवण्यासाठी धर्माच्या विवेकाधारित स्वरूपाची भूमिका फार मोठे कार्य करू शकते. एकसंधतेमुळे समाज बलकट बनतो. 'सद्सद्विवेकबुद्धी' हाच धर्माचा खरा आत्मा आहे त्याची जाणीव ठेवून वर्तन केले तरच माणसांचे उन्नयन होऊ

शकते. आणि माणसांचे उन्नयन झाल्याशिवाय समाजाचा उत्कर्ष होऊ शकत नाहीं. म्हणूनच धर्माचा असा खरा अर्थ लक्षात घेऊन आपले आचरण ठेवणे हे समाजाची आणि राष्ट्राची एकसंधता टिकवून ठेवण्याकरिता अत्यंत आवश्यक आहे, ती आज कालाची गरज आहे! तयाकरिता धर्माचे स्वरूप हे त्याच्या बाह्य रूपाकडून त्याच्या आंतरिक रूपाकडे वलवणे हा मार्ग आत्मसात करावा लागेल. शेवटी, मनावर संस्कार करणे आणि समाजाचे ह्या दिशेने प्रबोधन करणे हे जितके आवश्यक आहे, तितकेच आपण आपल्या स्वत:तच परिवर्तन घडवून आणणे हे ही अत्यंत महत्त्वाचे, किंबहुना अधिकच निकडीचे आहे.